# जाहीर सुचना

## अकोला जिल्हा सेतु समिती मार्फत सेतु सुविधा केंद्र सुरु करण्याबाबत

तहसिल कार्यालय ,उपविभागीय कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय व्दारा देण्यांत येणा-या विविध प्रमाणपत्रासाठी अर्ज स्विकृती, शपथपत्र तयार करणे व इतर सुविधा जनतेस निर्धारित सेवाशुल्कात उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. प्राप्त सेवा शुल्काचा एक भाग सेतु समितीस व उर्वरित रक्कम उपकेंद्रधारकास देय राहील. त्यासाठी परिशिष्ट एक नुसार अकोला जिल्हयात एका पेक्षा अधिक उपकेंद्र सुरु करणे प्रस्तावीत आहेत.

१.इच्छुक सस्था/ भागीदार /व्यक्ती यांचेसाठी अर्ज रुपये ५००/- रोखीने नियंत्रण कक्ष, सेतु विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचेकडे दिनांक २७ / ९ /२०१० ते दिनांक ८ / १० /२०१० या कालावधीत कार्यालयीन वेळेत विक्रीसाठी उपलब्ध आहे . उपकेंद्राची अटी व शर्तीची माहिती पुस्तीका अर्जासोबत मिळेल.

२.अर्ज नियंत्रण कक्ष ,सेतु विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे दिनांक २७ /९ /२०१० ते दिनांक ११ /१० /२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील.

३.निविदा जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथे दि.१२/१०/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यांत येतील.

प्राप्त अर्जाची छाननी करुन व मुलाखती अंती केंद्र चालकाची नेमणूक करण्यांत येईल.

परिशिष्ट एक

| अ.क्र. | उपविभाग क्षेत्र | सेतु सुविधा उपकेंद्र |
|---|---|---|
| १ | अकोला | १.डाबकी रोड, प्रिया टॉवर जवळ ,जुने शहर अकोला |
| | | २. कौलखेड ,अकोला |
| | | ३. अकोट फैल ,अकोला |
| | | ४.गांधी रोड ,अकोला |
| | | ५. जठारपेठ ,अकोला |
| २ | बार्शिटाकळी | १.ग्रामपंचायत परिसर चौक, बार्शिटाकळी |
| | | २. प्राथमिक आरोग्य केंद्र परिसर , बार्शिटाकळी |
| ३ | अकोट | १. शिवाजी चौक, अकोट |
| | | २. शिवाजी कॉलेज जवळ दर्यापूर रोड, अकोट |
| ४ | तेल्हारा | १. नगर परिषद चौक ,तेल्हारा, |
| | | २. बाजार परिसर , तेल्हारा |
| ५ | बाळापूर | १. बाजार परिसर ,बाळापूर |
| | | २. बाजार परिसर ,बाळापूर |
| ६ | पातूर | १. चिरा चौक , पातूर<br>२. खानापूर रोड, पातूर |
| ७ | मुर्तिजापूर | १. जुनी वस्ती टांगा चौक, मुर्तिजापूर |

| | | |
|---|---|---|
| | | २. आंबेडकर चौक, मुर्तिजापूर |

- निविदेच्या अटी व शर्ती निविदा फार्म सोबत दिलेली आहेत.
- निविदा दोन लिफाफे पध्दतीने भरावी लागतील.१. तांत्रीक लिफाफा २. व्यापारिक लिफाफा

१. तांत्रिक लिफाफा : निविदेसोबत जोडण्यांत आलेला फॉम मधील नमुद अटी व शर्तीची पूर्तता करणारा लिफाफा असेल

२. व्यापारिक लिफाफा: या लिफाप्यात कमर्शियल बीड चा उल्लेख असेल. निविदा अर्जातील परिशिष्ट-२ मध्ये दर्शविलेली कागदपत्रे.
अर्जासोबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतु समिती अकोला यांचे नांवे काढलेला रु.१,००,०००/- राष्टीयकृत बँकेचा EMD धनाकर्ष /TDR जोडणे आवश्यक आहे.

- निविदा मंजूर करणे किंवा नाकारणे तसेच निविदेच्या अटीमध्ये बदल करण्याचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष जिल्हा सेतू समिती तथा जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे राखून ठेवण्यांत येत आहेत.
- निविदा उघडल्यानंतर ती स्वीकारण्याबाबत ९० दिवसापर्यंत वैध राहील. हा कालावधी वाढविण्यास जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतु समिती अकोला सक्षम राहतील.

निविदेबाबतच्या अटी , शर्ती व नागरी सुविधा केंद्राच्या ( सेतू) कार्यप्रणाली बाबतची माहिती निविदेच्या अर्जात दिलेली आहे. तसेच उपरोक्त निविदा अवलोकना करिता www.akola.nic.in हया वेब साईटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : जिल्हाधिकारी कार्यालय अकोला
दिनांक : /९/२०१०

मुथुकृष्णन संकरनारायणन
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा सेतु समिती